# गीता समीक्षेची ऐतिहासिक दृष्टि

**डॉ. नी. र. वऱ्हाडपांडे**

वेद, रामायण, महाभारत वगैरे ग्रंथांचे समीक्षण करताना या ग्रंथांना धार्मिक महत्व प्राप्त झाले आहे ही एक मोठी अडचण आहे. या महत्वामुळे या ग्रंथांची वैज्ञानिक चिकित्सा केली की काही लोकांच्या श्रद्धा दुखावतात व ते अशा चिकित्सेत काय सत्य आहे हे समजून घेण्याच्या मन:स्थितीतच नसतात. दुसरी अडचण मिशनऱ्यांची आहे. मिशनऱ्यांचा उद्देश या ग्रंथांचे सत्य स्वरुप लोकांपुढे ठेवणे हा नसून हिंदू धर्माची निंदा करणे असल्यामुळे हे ग्रंथ धार्मिक आहेत हे त्यांची निंदा करण्यास मिशनऱ्यांच्या लेख सबळ कारण होऊन बसते.

या ग्रंथाचे यथार्थ मूल्यमापन न होण्याचे दुसरेही एक कारण आहे. ते म्हणजे हे ग्रंथ इतर ग्रंथाप्रमाणे एककर्तृक नाहीत. वेद हे निरनिराळ्या काळी तीनशेच्या वर ऋषींनी रचलेल्या सूक्तांचे एक संकलन आहे. या संकलनातील सर्वात प्राचीन भाग सुमारे दहा हजार वर्षांपूर्वी रचला गेला असण्याचा संभव आहे. कारण त्यात सरस्वती नदी समुद्राला मिळते असा उल्लेख आहे व अश्विनी नक्षत्रामध्ये उत्तरायण सांगितले आहे. अर्जुनी नक्षत्रात पावसाळा सुरु होतो हा उल्लेख खि. पू. चा आहे. शंतनूचा भाऊ देवापि याने ऋग्वेदातील पर्जन्यसूक्त रचले यावरुन ऋग्वेदाचा शेवटचा भाग भारतीय युद्धाच्या साधारपणे शंभर वर्षा पूर्वी रचला गेला असे ठरते. तात्पर्य ऋग्वेदाची रचना सुमारे पाच हजार वर्षांपर्यंत होत होती.

रामायण वाल्मीकीने व महाभारत व्यासाने रचले म्हणजे हे ग्रंथ एककर्तृक आहेत अशी परंपरा आहे. पण रामायणात चैत्र महिन्याच्या शेवटी हिवाळा संपतो व भाद्रपद हा पावसाळ्याचा पहिला महिना आहे. खि. पू. ३७०० हे उल्लेख आहेत श्रावणात पावसाळा सुरु होतो. हा खि. पू. दुसऱ्या सहस्रकातला उल्लेख आहे, बुद्धाचा व शक हूणांचा उल्लेख खि.पू. पहिल्या सहस्रकातला आहे. रामाचा व वाल्मीकाचा काळ खि. पू. ३७०० हा मानला व मूळ रामायण वाल्मिकेने रचले ही परंपरा लक्षात घेतली तर रामायणाची रचना खि. पू. ३७०० पासून खिस्ती शतकाच्या प्रारंभापर्यंत होत होती असे मानावे लागते. म्हणजे सारे रामायण वाल्मीकि या एकाच कर्त्यांचे असूच शकत नाही. हजारो वर्षांच्या काळात रामायणाला सध्याचे स्वरुप प्राप्त झाले असल्यामुळे त्याच्या रचनेत शेकडो, निदान डझनवारी लेखकांचे हात लागले असले पाहिजे.

महाभारत अनेक कर्त्यांचे आहे हे जवळपास सर्वमान्य आहे. सारे महाभारत एकट्या व्यासाने रचले हे मत आज कोणत्याही संशोधकाला मान्य होणार नाही. प्राचीन इतिहासाच्या संशोधनाबद्दल पूर्णपणे अनभिज्ञ असलेल्या लोकांनाच सारे महाभारत व्यासाने रचले असे वाटू शकते.

महाभारतातील प्राचीनतम उल्लेख माघशुक्ल अष्टमीला उत्तरायण सुरु होते हा आहे. तो खि. पू. ३१०१ या कलियुगारंम्भाभाकडे संकेत करतो. कार्तिक हा शरदऋतुचा दुसरा- महिना व मार्गशीर्ष हा हेमंतातील वर्षारंभ हे गीतेतील वचन खि. पू. दुसऱ्या सहस्रकाकडे संकेत करते. तर बुद्ध व शक यांचे उल्लेख खि.पू. पहिल्या सहस्रकाकडे अंगुलिनिर्देश करतात.

केवळ खगोलीय निर्देशच महाभारताचे अनेकाकालीनत्व दाखवितात असे नाही. पुरातत्त्वाच्या

**भगवद्गीतेतले विचार किंवा तत्त्वज्ञान सामान्य जिज्ञासूंच्या दृष्टिने वादग्रस्त नसले तरी काही चिकित्सक अभ्यासक इतर मुद्द्यांच्या संदर्भात वादग्रस्त मुद्दे उपस्थित करीत असतात. गीतेचा कर्ता एक की अनेक ? गीता प्रत्यक्ष कुरुक्षेत्रावर ऐन युद्धाच्या प्रसंगी सांगितली गेली की नंतर कधी तरी फुरसतीच्या क्षणी? गीता अर्जुनाला युद्धासाठी प्रवृत्त करते की, त्याला अहिंसेची शिकवण देते ? अशा शंकाकुशंका उपस्थित करणाऱ्या संशयात्म्यांना आमचे एक मिस्किल मित्र फाल्गुनराव अश्विनशेठ यांच्या पंक्तीला नेऊन बसवीत असतात !**

**प्रस्तुत लेखात लेखकाने उपस्थित केलेल्या शंका तशा स्वरुपाच्या नसून त्यांना भक्कम वैचारिक बैठक आहे अशी आमची धारणा आहे ! वाचक बंधूनो तुमच्याहि प्रतिक्रिया जाणून घ्यायला आम्ही उत्सुक आहोत !**

**-संपादक**

दृष्टीने देखील महाभारतात अनेक स्तर दिसून येतात. भारतीय युद्धकाली गदा हे शस्त्र प्रचारात होते ही गोष्ट फार सूचक आहे. गदा हे अत्यंत अवजड शस्त्र आहे, त्याने फक्त वरुन खाली वार करता येतो. खालून वर वार केल्यास गदेच्या वजनामुळे तो फार जोराने लागण्याचा संभव नाही. या शस्त्राचा वापर तरवारीचा शोध लागला नसल्याचा द्योतक आहे. तरवारीने वरुन खाली तसेच बाजूने त्वरित वार करता येतो, तसेच भोसकण्याचीही क्रिया करता येते.

**हजारो वर्षात रचले गेलेले ग्रंथ**

तरवारीचा शोध कांस्ययुगात लागला. कांस्ययुग साधारपणे ख्रि.पू. ३००० च्या सुमारास सुरु झाले. या दृष्टीने भारतीय युद्धाचा काल ख्रि. पू. ३१०१ हा कलियुगाच्या आरंभीचा मानणे योग्य आहे.

भारतीय युद्धातील तरवारीच्या प्रहाराची जी वर्णने आहेत ती वरील सिद्धांताला पोषकच आहेत. भूरिश्रवा सात्यकीचा शिरच्छेद करण्यासाठी त्याकेस पकडून आपली 'तरवार' त्याच्या मानेवर चालवू पाहतो. तसेच दृष्टधृन द्रोणाचार्याचा शिरच्छेद करतो. तो देखील त्याचे केस पकडूनच. या वर्णनावरुन हे स्पष्ट आहे की या तरवारी तांब्याच्या होत्या. तांब्याच्या 'तरवारी' पूर्ण लांबीच्या करता येत नाहीत कारण त्या तशा केल्या तर केव्हाही व कुठेही वाकतात व योद्धा ऐन वेळी नि:शस्त्र होण्याची भीती असते. शिवाय तांब्याच्या तरवारींची धार फारशी तीक्ष्ण करता येत नाही. त्यामुळे तांब्याचे खंजीर करीत. अशा खंजीराने दुरुन मानेवर घाव करून शिरच्छेद करणे शक्य नसे. केस हातात पकडून मानेवरही तरवार खंजीरासारखी चालवावी लागे.

शत्रूच्या अंगाला न भिडता एका वाराने शिरच्छेद करु शकेल अशी तरवार काशाच्या शोधानंतर करता आली. तिचाही उल्लेख अभिमन्यू जयद्रथ युद्धात आहे. जयद्रथाने अभिमन्यूवर आपल्या तरवारीने वार केला. तो त्याने चुकविला तेव्हा जयद्रथाची तरवार अभिमन्यूच्या भात्यात अडकली तेव्हा ती बाहेर काढण्यासाठी जयद्रथाने जोराने ओढली तेव्हा त्या तरवारीचे तुकडे झाले.

भाता चामड्याचा करीत. चामड्याच्या भात्यात अडकलेली तरवार हिसका मारल्याबरोबर तुटली त्याअर्थी ती काशाची तरवार होती. पोलादाची तरवार अशी हिसक्याने तुटत नाही. सारांश हा उल्लेख कांस्ययुगातला म्हणजे ख्रिस्तपूर्व १५०० चा पूर्वीचा आहे.

महाभारतात शक हूणांच्या व बुद्धांचा उल्लेख आहे. अर्थात ख्रि. पू. पहिल्या शतकातले उल्लेख देखील महाभारतात आहेत.

काही लोक असे म्हणतात की ज्या श्लोकात नंतरचे उल्लेख आहेत ते श्लोक वगळून बाकी सर्व व्यास/ वाल्मीकींचे समजावे पण असे करता येणार नाही.

रामायणात दोन अनुक्रमणिका आहेत. एका अनुक्रमणिकेत बालकांडातील पुष्कळसा भाग व उत्तरकांड नाही. तेव्हा बालकांडाचा पुष्कळसा भाग व उत्तरकांड सारेच प्रक्षिप्त मानले पाहिजे. तसेच महाभारतात शांतीपर्व म्हणून भीष्माने केलेला विस्तृत उपदेश आहे. तो त्याने ५८ रात्री शरपंजरी पडले असताना युधिष्ठिराला ऐकविला असे म्हटले आहे पण भीष्म पडल्यानंतर सहा दिवस पांडव कुरुक्षेत्रावर युद्ध करीत होते. त्यांना भीष्माचा उपदेश ऐकण्याची सवड नव्हती. युद्ध संपल्यावर ५० दिवस ते हस्तिनापुरात राहिले. तेव्हा ५८ रात्री पांडवांनी भीष्माकडून धर्मशास्त्र ऐकले ही महाभारतात मागून कोणीतरी घातलेली भर आहे.

महाभारतात मूळ व्यासाचे महाभारत चोवीस हजार वा आठ हजार श्लोकांचे होते. ते वैशंपायनाने वाचून त्याचे भारत केले व सौतीने शेवटी त्याचे महाभारत केले असा स्पष्ट उल्लेख आहे.

तात्पर्य रामायण महाभारतादि ग्रंथांचे सम्यक आकलन व्हायचे असेल तर हे ग्रंथ एककर्तृक नाहीत. हजारो वर्षांच्या कालखंडात रचले गेले आहेत ही गोष्ट सतत ध्यानात ठेवली पाहिजे. गीता हा महाभारताचा एक भाग आहे. गीतेवर अनेक भाष्ये झाली. पण या साऱ्या भाष्यकारांनी सर्व गीता कृष्णाने रणांगणावर सांगितली असे गृहीत धरले आहे.

**म. गांधीचे गीताभाष्य**

लो. टिळकांनी गीतेचा पुष्कळसा भाग बुद्धोत्तर आहे हे मान्य केले आहे. पण तरीही सारी गीता समयोचित व सुसंगती आहे असे गृहीत धरले आहे. महाभारताप्रमाणेच गीतेत जर वेळोवेळी भर पडली असेल तर तिच्यात असलेली सुसंगती ही भर टाकणाऱ्याने आपली भर ओळखता येऊ नये म्हणून साधलेली सुसंगति ठरते. त्यामुळे मूळ गीतेचा शोध घेणे हे काम गीतेच्या उपदेशाचे मर्म समजण्यासाठी आवश्यक ठरते. पण मूळ गीतेचा शोध लावणे हे आज अशक्य कोटीतले आहे. एखादा श्लोक व त्यासंबंधीचे इतर चारदोन श्लोक नंतरचे आहेत एवढे सांगता आले तरी गीतेच्या मोठमोठ्या भागापैकी अमुक भाग पूर्णपणे नंतरचा आहे असे सांगणे जवळजवळ अशक्य आहे.

काही लोकांच्या मते सारीच गीता महाभारतात मागाहून घुसडण्यात आली आहे व्यासाने गीता रचलीच नाही. रणांगणावर तत्त्वज्ञानाची चर्चा कशी काय होऊ शकेल असाही प्रश्न यासंबंधी विचारण्यात येतो. गीतेचा सारा प्रसंगच काल्पनिक आहे. भारतीय युद्ध खरेच झाले असेल तर त्या युद्धाच्या प्रसंगी गीता सांगितली असणे अशक्य आहे असे या लोकांचे म्हणणे आहे.

म. गांधीसारखे गीतेचे टीकाकार गीतेचा सारा प्रसंग काल्पनिक मानतात, एवढेच केवळ नव्हे. तर गीतेने ज्या युद्धाचे निमित्त करून आपला उपदेश केला आहे ते युद्ध हे भाव भावातील ऐतिहासिक युद्ध नसून सत्प्रवृत्ति व असत्प्रवृत्ती यांच्यामधील युद्ध आहे असा त्यांचा सिद्धांत आहे. असे मानल्याने गीतेत केलेला अध्यात्म या विषयाचा विस्तार असंबद्ध न वाटता त्याचा गीतेच्या समस्येशी घनिष्ट संबंध स्थापित होतो. तसेच भावाभावामधील युद्धाचे समर्थन करण्यासाठी गीता सांगितली गेली असे म्हटल्याने गीतेचे महत्त्व कमी होते असाही गांधीचा एक मुद्दा आहे. गीतेत मानव युद्धाला विरोध करतो व देव मात्र एका हिंसक यादवी युद्धाचे समर्थन करतो हे विचित्र आहे असे विल ड्युरण्टने देखील म्हटले आहे.

गीतेला आध्यात्मिक दृष्ट्या समर्थनीय ठरविण्यासाठी गांधींची कल्पना उपयुक्त असली तरी ती स्वीकारण्यात अनेक अडचणी आहेत. गीतेतील युद्ध सत्प्रवृत्ति व असत्प्रवृत्ति यांच्यातील युद्ध आहे. असे मानले तरी महाभारत हा ग्रंथ एका ऐतिहासिक युद्धाचे वर्णन करीत नसून महाभारतात वर्णिलेले युद्ध देखील सत्प्रवृत्ति व असत्प्रवृत्तित यांच्यामधील युद्धावर बसविलेले एक रूपक आहे हे महाभारत वाचणाऱ्या कोणत्याच वाचकाला पटणार नाही. भारतीय युद्ध हे रूपक ठरविले तर पानिपतचे युद्ध हे देखील रूपक ठरविता येईल व कुणाला इतिहास लिहिताच येणार नाही.

गीता स्वतंत्रपणे रचली व मागाहून महाभारतात समावेश केला असेही मानता येत नाही. लो. टिळकांनी या मुद्द्याचा सविस्तर विचार करून गीतेचे कित्येक श्लोक किंवा श्लोकार्ध महाभारतभर कसे विखुरलेले आहेत हे दाखवून दिलेले आहे. तेव्हा गीता हे महाभारताशी एकजीव असलेले प्रकरण होते याबद्दल शंका राहत नाही. शिवाय गीतेतील अर्जुन विषादयोगात उल्लेखिलेले युद्ध हे भावाभावातील खरे युद्ध असल्याशिवाय अर्जुनाच्या विषादाची उपपत्तिच लागत नाही. आप्तस्वकीयांशी युद्ध

कसे करु ही अर्जुनाची समस्या होती. तो युद्ध न करण्याची प्रतिज्ञा करुन बसलेला शांततावादी व अहिंसावादी नव्हता. तेव्हा भावाभावातील युद्धाचे समर्थन करण्यासाठी गीता सांगितली गेली असे मानल्याने गीतेचे महत्व कमी होते. असे कुणास वाटले तरी गीतेतील युद्ध काल्पनिक मानण्यास ते सबळ कारण असू शकत नाही. गीतचे महत्व वाढविणे हे गीता विषय संशोधनाचे व गीताभाष्याचे उद्दिष्ट असू शकत नाही.

**व्यासकालीन कसोट्या**

गीता मुळात कौरवपांडवांच्या युद्धाच्या वेळीच सांगितली गेली पण तिच्यात भर घालणाऱ्यांनी गीता हा एक अध्यात्माचा उपदेश आहे अशी कल्पना करुन ऐतिहासिक युद्धाशी संबंध नसलेला, पण सदाचाराच्या प्रश्नाशी ज्याचा संबंध आहे असे मानण्यात येते असा अध्यात्माचा भाग त्यात घुसडला असेच मानावे लागते.

गीता रणांगणावर सांगणे कसे शक्य आहे ही शंका युद्धाबद्दल गाढ अज्ञान दाखविणारी आहे. युद्ध हे एखाद्या फूटबॉलच्या सामन्यासारखे असते व फुटबॉल खेळताना ज्याप्रमाणे तत्त्वज्ञानाची चर्चा करणे अशक्य आहे त्याप्रमाणे रणांगणावर तत्वज्ञानाची चर्चा अशक्य आहे अशी ही समजूत आहे. वस्तुतः रणांगण हे अनेक मैल विस्तृत असते. दोन सैनांची एकमेकांशी टक्कर होण्यास देखील त्यांना काही मैलांचे अनंतर पुढे सरकावे लागते, शिवाय सैन्ये रणांगणावरच छावण्या ठोकून राहतात व या छावण्यामध्येक्ष त्यांचे झोप, भोजन, स्नान वगैरे सर्व व्यवहार होतात. युद्धाला तोंड लागल्यावरही सैनिक सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत अन्नपाण्याशिवाय लढत असतात ही कल्पना भाबडेपणाची आहे. पहारेकरी ज्याप्रमाणे पाळीपाळीने पहारा देतात त्याचप्रमाणे सैनिक देखील पाळीपाळीने लढतात व त्यामुळे काही सैनिक लढत असताना काही भोजन वा विश्रांति घेऊ शकतात.

भारतीय युद्ध केवळ कुरुक्षेत्रावर लढले गेले अशी समजूत आहे. पण महाभारतात स्पष्ट सांगितले आहे की कौरवपांडवांची सैन्ये पाकिस्तानातील आजचा पंजाब, मरु म्हणजे राजस्थान, ही आघाडी हजार मैलाच्या ज़वळपास पडते.

यासबंधात सारथी व रथी यांचे संबंध लक्षात घेणे जरुर आहे. सारथी हा सूत म्हणजे पुराणिक असे ही गोष्ट नेहमी विसरली जाते. सारथी हा सूत असण्याचे कारण रथाचा पुष्कळसा वेळ प्रत्यक्ष युद्धापेक्षा युद्धाच्या हालचाली करण्यातच जातो. अशा वेळी सारथी पौराणिक गोष्टी सांगत असतो. तेव्हा सारथ्याने रथीला प्रवचने देणे हा प्रकार सर्रास रुढ असल्यामुळे रणांगणावर गीता काहीच अडचण नाही.

गीता मूळ महाभारतात होती असे मानण्यास काहीच हरकत नाही, पण आजची समग्र गीता रणांगणावर सांगितली गेली नाही हेही तिकेच खरे आहे. कोणता भाग मूळ गीतेत नव्हता हे ठरविण्यास खालील तत्त्वे उपयोगी पडू शकतात.

१) पाणिनी व त्यानंतरच्या भाषेत रुढ नसलेले शब्दप्रयोग जेथे आहेत तो भाग प्राचीन समजावा वेदात जे शब्दप्रयोग येण्याचा संबंध नाही असे शब्दप्रयोग असणारा भाग अर्वाचीन समजावा.

२) कलियुगारंभाच्या शेकडो वर्षा नंतरचा काळ सुचविणारे उल्लेख नंतरचे समजावे.

३) श्रीकृष्णाचे ईश्वर म्हणून वर्णन करणारे भाग नंतरचे समजावे. विश्वरुपदर्शन होईपर्यंत अर्जुन श्रीकृष्णाला ईश्वर समजत नव्हता हे गीतेतच सांगितले आहे. व्यासकाळीच श्रीकृष्णाला ईश्वर म्हणून मान्यता मिळाली असती तर भीष्म व द्रोण हे हल्लीच्या महाभारतानुसार श्रीकृष्णाला ईश्वर मानीत असल्यामुळे त्याच्याविरुद्ध लढले नसते.

वरील कसोट्या लावल्या तर खालील निष्कर्ष काढावे लागतात. अर्जुन विषादयोगाचा प्रसंग व्यासकालीन महाभारतात होता. त्यात 'मित्रद्रोह' **हा महत्वाचा शब्द** आहे. अर्जुन विचारतो, 'दुर्योधन मित्रद्रोहाचे पातक करीत असला म्हणून आपण कुलक्षयाचे पातक करावे काय ?

**गीतेतील व्यासोत्तर भाग**

मित्रद्रोह या शब्दाचा सध्याचा संस्कृमधील अर्थ मित्राचा म्हणजे दोस्ताचा द्रोह असा आहे. पण असा अर्थ केला तर दुर्योधनाने मित्रद्रोह केला हा आरोप निराधार ठरतो. दुर्योधनाने मित्रद्रोह तर केला नाहीच, उलट कर्णाशी त्याने निरपवाद मैत्री राखली. तेव्हा येथे मित्रद्रोह या शब्दाचा द्रोह असा अर्थ नाही.

येथे मित्र या शब्दाने मित्र हा देव विवक्षित आहे. मित्र हा देव करायचे गांभीर्य व एकूणच नीतिमूल्यांचे जतन करणारा देव होता. राजांमध्ये तह झाला की त्या तहाचे पालन दोघांकडूनही होवो म्हणून राजे प्रार्थना करीत. अशीच एक प्रार्थना बोगाझकोई येथल शिलालेखात हिटाइट व मिट्टानी यांच्यातील तहासंबंधी आहे. अर्जुन दुर्योधनाला मित्रद्रोही म्हणतो. कारण वनवासाहून परत आल्यानंतर राज्य परत देण्याचा करार त्याने पाळला नाही. मित्रद्रोह हा वाक्प्रयोग थेट वेदकालीन असल्यामुळे गीतेतील अर्जुनविषाद्योगाचा भाग व्यासकालीन मानण्यास हरकत नाही.

दुसऱ्या अध्यायातील कर्मकांडाची व वेदांची अवहेलना खि.पू. दुसऱ्या सहस्त्रातील उपनिषत्कलाची वाटते. त्यामुळे हा भाग व्यासकालीन मानता येत नाही.

चवथ्या अध्यायाची सुरूवातच श्रीकृष्ण स्वतःला भगवान् समजून करीत असल्यामुळे हा भाग व्यासकालीन मानता येत नाही.

पाचव्या अध्यायात ब्रह्मनिर्वाण हा शब्द आहे. निर्वाण

शब्दाचा अध्यात्मिक उपयोग बौध्द दर्शनातच प्राधान्याने आढळतो. तेव्हा पाचव्या अध्यायाचा बराचसा भाग बुद्धोत्तर असावा.

सहाव्या अध्यायात पातंजल योगाचे प्रतिपादन आहे. पांतजलयोग पतंजलीने काढला असे मानता येत नाही. पण ती सूत्रकालात म्हणजे खि. पू. दुसऱ्या सहस्रकात विकसित झाला असे म्हणता येते. तेव्हा हा भाग व्यासकालीन दिसत नाही. व्यासकालीन भागात कर्मयोग वगैरे शब्द आहेत. तेथे योग हा शब्द वेदकालीन अर्थाने वापरला आहे, सूत्रकालीन अर्थाने नव्हे. तेव्हा कर्मयोग पर भाग व्यासकालीन असावा.

सातवा अध्याय श्रीकृष्णाच्या ईश्वररुपाचे वर्णन करतो तेव्हा तो व्यासकालीन असूच शकत नाही.

आठवा अध्याय देखील श्रीकृष्णाचे ईश्वरत्व सांगणारा आहे. तेव्हा तो व्यासकालीन नाही. नवव्या अध्यायालाही हेच लागू आहे.

दहाव्या अध्यायात श्रीकृष्णाच्या ईश्वररुपाबरोबरच 'मे महिन्यातला मार्गशीर्ष आहे' म्हणजे पहिला महिना आहे असे वचन आहे. या वचनावरुन हा भाग खि. पू. दुसऱ्या सहस्रकातला आहे असे अनुमान करता येते. हल्ली व्यापारी दिवाळीत नवीन वहीखाते सुरु करतात म्हणजे दिवाळीपासून वित्तवर्ष सुरु होते. या अध्यायाच्या काळी ते मार्गशीर्षात सुरु होते असले पाहिजे. तेव्हा हा भाग व्यासकालीन नव्हता याचे हे स्पष्ट प्रमाण आहे.

अकरावा विश्वरुपदर्शनाचा अध्याय सरळच पौराणिक स्वरुपाचा व कृष्णाचे ईश्वरत्व सांगणारा आहे, बाराव्या अध्यालाही हेच विधान लागू आहे.

तेराव्या अध्यायातील सांख्याची चर्चा अर्जुनाच्या प्रश्नाशी संबंध नाही व या अध्यायात ब्रह्मसूत्राचा उल्लेख आहे. ब्रह्मसूत्रात बौद्धांचे खंडन आहे त्याअर्थी हा अध्याय बुद्धोत्तर आहे.

बारावा अध्याय श्रीकृष्णाचे ईश्वररुप सांगणारा आहे. म्हणजे व्यासकाळातील नाही. हेच पंधराव्या अध्यायालाही लागू आहे.

सोळाव्या अध्यायात स्पष्टपणे श्रीकृष्णाचे ईश्वररूपाने वर्णन व दैवी आणि आसुरी संपत्ती याबद्दलचा अर्जुनाच्या प्रश्नाच्या प्रश्नाशी संबंध नसलेला विस्तार यावरुन हाही अध्याय व्यासकालीन म्हणता येणार नाही. याचीच पुष्टि 'असत्य प्रतिष्ठते...या श्लोकात नागार्जुनाच्या शून्यवादाचे वर्णन यावरुन होते.

सतराव्या अध्यायात अर्जुनाच्या प्रश्नाशी साक्षात् संबंध नसलेल्या सत्व, रज, तमादि गुणांचे वर्णन आहे तेव्हा हा अध्याय व्यासकालीन नसावा. अठराव्या अध्यायात हाच विषय पुढे चालविला असून शिवाय श्रीकृष्णाचा ईश्वररुपाने उल्लेख आहे. तेव्हा हा बहुतेक अध्याय व्यासकालीन नाही. शेवटी संजय व्यासाच्या कृपेने मी कृष्णर्जुनांचा संवाद ऐकला असे म्हणतो. हे वाक्य अर्थात् यासोक्त नाही.

तात्पर्य, गीता हा एककर्तृक व एककालीन ग्रंथ नाही हे लक्षात घेऊन गीता वाचली नाही तर गीता बरोबर कळणार नाही.